**महावितरण**

(AGovt. of Maharashtra Undertaking)
CIN:U40109MH2005SGC153645

दूरध्वनीक्र.२६४७२१३१/२६४७४२११
फॅक्स नं. : २६४७५८१४
email :ciro@mahadiscom.in
website:www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग,
प्लॉटजी-९,प्रकाशगड, ४था मजला
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व),
मुंबई- ४०० ०५१.

जा.क्र. : औसंवि/अ/७२५७

दिनांक : १३.३.२०१९

प्रति,
सरचिटणीस
महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ
विश्वकर्मा भवन, १८५, शनिवार पेठ,
पुणे- ४११ ०३०.

**विषय :** दि.२७/०२/२०१९ रोजीच्या बैठकीचा इतिवृत्तांत.
**संदर्भ :** ऊर्जा विभाग,महाराष्ट्र शासन यांचा ईमेल दि.२५.०२.२०१९.

*****

दि.२७/०२/२०१९ रोजी मा. मंत्रीमहोदय (ऊर्जा), महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षेतखाली महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघ (भारतीय मजदुर संघ, महाराष्ट्र प्रदेश) यांच्या प्रतिनिधी समवेत बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीचा इतिवृत्तांत आपल्या माहितीकरिता सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सोबत : वरीलप्रमाणे.

(संजय रा. ढोके)
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी)

प्रत सविनय सादर :
१. संचालक (संचलन), महावितरण, मुंबई
२.कार्यकारी संचालक, महावितरण / महापारेषण / महानिर्मिती, मुंबई
३. स्वीय सहाय्यक (मा. प्रधान सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र शासन, मुंबई.
४.मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महापारेषण / महानिर्मिती कंपनी, मुंबई

C:\Users\dhoke\Desktop\kantrati meeting 27.02.19.docx

# बैठकीचा इतिवृत्तांत

मा. मंत्रीमहोदय(ऊर्जा), महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षेतखाली दिनांक २७/०२/२०१९ रोजी महाराष्ट्र विज कंत्राटी कामगार संघ (भारतीय मजदुर संघ, महाराष्ट्र प्रदेश) यांच्या प्रतिनिधी समवेत एच एस बी सी बँक इमारत, फोर्ट मुंबई येथे बैठक आयोजित केली होती.

सदर बैठकीमध्ये खालील अधिकारी, लोकप्रतिनीधी व संघटना प्रतिनिधी उपस्थितीत होते:-

**अ) कंपनी अधिकारी :**

१) मा. प्रधान सचिव (ऊर्जा), महाराष्ट्र शासन तथा अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक महानिर्मिती कंपनी मुंबई
२) मा. संचालक, मराविम सुत्रधारी कंपनी, मुंबई
३) मा. संचालक (संचलन), महावितरण कंपनी, मुंबई
४) मा. कार्यकारी संचालक, महावितरण/महापारेषण/महानिर्मिती कंपनी, मुंबई
५) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महावितरण/महापारेषण/महानिर्मिती कंपनी, मुंबई

**ब) महाराष्ट्र शासन कामगार विभागाचे अधिकारी:**

१) मा. उप सचिव, कामगार विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई
२) मा. सहआयुक्त (कामगार), महाराष्ट्र शासन, मुंबई
३) मा. सहाय्यक आयुक्त (कामगार), महाराष्ट्र शासन मुंबई

**क) लोकप्रतिनिधी व संघटना प्रतिनिधी :**

१) मा. सौ. मेधा कुलकर्णी, आमदार, महाराष्ट्र शासन, मुंबई
२) श्री. अण्णा देसाई
३) श्री. निलेश खरात
४) श्री. शरद संत व इतर

**सदर बैठकीमध्ये कंत्राटी कामगार प्रश्नावर सविस्तर चर्चा झाली.**

**१)** सदर तिन्ही कंपन्यामध्ये N.M.R. पध्दत लागु करता येणार नाही.

**२)** कंत्राटी कामगारांना कोणतेही परिस्थितीत कायम सेवेत घेता येणार नाही.

**३)** महावितरण व महापारेषण कंपनीने मंडल निहाय /जिल्हा निहाय मंडळ एकच मनुष्यबळ पुरवठा कंत्राट दोन वर्षाच्या कालावधीकरीता काढावे. सदर प्रक्रीयेची माहे एप्रिल २०१९ पासून सुरु करण्याची कार्यवाही करावी. सदर कार्यदेशात आवश्यकतेनुसार मुदतवाढ करण्याबाबतची अट नमूद करावी.

**४)** कंत्राटी कामगारांना नियंत्रण अधिका-याच्या अनुमती शिवाय कंत्राटामधून काढून टाकण्यात येवू नये. निविदेच्या अटी व व शर्ती तयार करताना सदर अट कार्यदेशात नमूद करावी.

C:\Users\dhoke\Desktop\Revise Baitak 27.02.19.docx

५) महावितरण व महापारेषण कंपनीतील कंत्राटी कामगारांना कामावरून कमी केले असल्यास त्याची शहानिशा करावी. याबाबत तांत्रिक शैक्षणिक अर्हता प्राप्त नसलेल्या कंत्राटी कामगारांना कमी करण्यात आले असल्यास अशा बाबतीत महावितरण कंपनीच्या यंत्रणेचा विचार करुन त्यांचेबाबत तडजोड करता येणार नाही. सदर बाबतीत संघटनेच्या तीन प्रतिनिधीनी प्रशासन प्रतिनिधीसोबत बसून त्यावर चर्चा करावी.

६) महानिर्मिती कंपनीच्या धर्तीवर महावितरण व महापारेषण कंपनीमधील कंत्राटी कामगारांचे वेतन कंत्राटदामार्फत देण्याची पध्दत अवलंबण्यात यावी. याकरिता संबंधीत कंत्राटदारामार्फत एस्क्रो (ESCROW) अकाउंटची सुविधा सुरु करण्यात यावी. याद्वारे किमान वेतन, पीएफ, ईएसआय इ. देयके संबंधीत खात्यात जमा होतील.

७) महानिर्मीतीच्या कंत्राटी कामगारांना लागू केलेले सर्व अधिभार महावितरण व महापारेषण कंपनीतील कर्मचा-यांना लागू करावे. यामध्ये फक्त कारखाने अधिनियमांतर्गत येणारे संबंधित अधिभार वगळण्यात यावे.

८) महानिर्मिती कंपनीच्या धर्तीवर कंत्राटी कामगारांबाबतची पुस्तिका (**Booklet**) तयार करावी.

---------